# गरिबीमुळे शिक्षणाला मुकलेल्यांना सं

## दिवसभर काम करून मुलंमुली इथे शिकतात



जेव्हा तुमच्या-आमच्या घरातली मुलं झोपून उठतात, त्यावेळी देशातली त्यांच्याच वयाची हजारो मुलं एखाद्या हॉटेलमध्ये टेबलांवरची खरकटी साफ करीत असतात किंवा कपबश्या विसळत असतात. त्यांच्याकरता बालपण कधीच रम्य नसतं. भारतातल्या कोणत्यातरी आडगावातून आलेली ही मुलं घराच्या उबेपासून आणि आईवडिलांच्या छत्रापासून लांब कुठेतरी राहून स्वत:च पोट भरत असतात आणि घरी पैसे पाठवत असतात.

घरातल्या घनघोर दारिद्र्यामुळे लहानपणीच कामाला लागल्यावर शिक्षणाचा प्रश्नच येत नाही; पण शिक्षण नाही म्हणजे उभा जन्म अशाच प्रकारे काबाडकष्ट करण्यात जाणार. आताच्या जगात शिक्षणाचं महत्त्व प्राणवायू इतकं आहे. याची जाणीव असलेली ही मुलं त्यांना बाल कामगार किंवा कर्मचारीच म्हणायला हवं. रात्रीच्या शाळांमध्ये (नाइट स्कूल्स) शिकतात. हॉटेलव्यवसायातीलच नाही, तर ज्यांना दिवसभर पोटापाण्याचं काम करावं लागतं, अशी वेगवेगळ्या व्यवसायांतली, साधारण १४ ते २६ वयाची मुलंमुली/तरुणतरुणी या शाळांमध्ये शिकत असतात. साधारणत: ७ वी ते ११वी पर्यंतचं शिक्षण या रात्रशाळांमधून मिळतं. संध्याकाळी ६ ते ७च्या दरम्यान या शाळा सुरू होतात आणि रात्री १० ते ११च्या आसपास संपतात.

अलीकडच्या काळात मुक्त विद्यापीठं, नियमित विद्यापीठं आणि खासगी संस्था यांनी कॉरस्पॉन्डन्स/पोस्टल कोर्सेस म्हणजे टपालाद्वारे नोट्स पुरवणारे अभ्यासक्रम सुरू केल्यामुळे शहरांमधून नाइट स्कूल्सची संख्या कमी झालेली दिसते; पण २५/३० वर्षांपूर्वी अशा शाळा-कॉलेजांना दिवसाच्या शाळा-कॉलेजांसारखीच विद्यार्थ्यांची गर्दी असायची. आता ती कमी झाली असली तरी या शाळांची गरज कायमस्वरूपी आहे. कारण एक तर पोस्टल कोर्सेसच्या पोस्टानं येणाऱ्या नोट्स वाचून स्वयं शिक्षण करण्याची क्षमता सर्वांमध्ये नसते. बहुतेकदा पदवीधरच अशा प्रकारच्या कोर्सेसचा लाभ घेऊ शकतात. नाइट स्कूलमधलं शिक्षकाचं अस्तित्व विद्यार्थ्यांच्या दृष्टीनं महत्त्वाचं असतं. अनुभवी शिक्षकाच्या कौशल्यामुळे विद्यार्थी विषयाचं लगेच ग्रहण करू शकतो. ते जमलं नाही, तर लगेच शिक्षकाला विचारून शंकाकुशंका दूर करता येतात. तिसरी गोष्ट म्हणजे शाळा/कॉलेजच्या निमित्तानं या विद्यार्थ्यांना 'सोशल लाइफ' मिळतं. मित्र मिळतात. दिवसभर काम करणाऱ्या या मुलांना समाजात मिसळण्याची संधी मिळत नाही. त्यासाठी त्यांच्यापाशी वेळ नसतो आणि त्यांच्या पेशाला प्रतिष्ठा नसेल, तर संधी मिळणं कठीण जातं.

**साधारणत: ७ वी ते ११वी पर्यंतचं शिक्षण या रात्रशाळांमधून मिळतं. संध्याकाळी ६ ते ७च्या दरम्यान या शाळा सुरू होतात आणि रात्री १० ते ११च्या आसपास सुटतात.**

ही संधी नाइट स्कूलमुळे मिळते, म्हणून विद्यार्थी इथे यायला खूष असतात. वास्तविक दिवसभराच्या कामानं थकवा आलेला असताना लगेच शिक्षणासारख्या बौद्धिक कामावर लक्ष एकवटणं सोपं नसते; पण इथे भेटणाऱ्या समवयस्क मित्रांमुळे वेळ चांगला जातो; मन प्रसन्न होतं आणि दिवसभरच्या श्रमांचा केव्हाच विसर पडतो. एका उडपी हॉटेलमध्ये फरशी पुसण्याचं काम करणारा बाला म्हणतो, “हॉटेलमध्ये मी सतत इतरांपुढे वाकून उभा असतो; पण शाळेतलं वातावरण मोकळं आहे. तिथे सगळी एकाच दर्जाची आहेत. किंवा खरं म्हणजे दर्जा, जात, पैसा... यांना इथे स्थानच नाही. आमच्या वर्गात काही मुलीपण आहेत. त्याही आमच्याबरोबर थट्टामस्करीत, गप्पांत सामील होतात, तेव्हा आणखीच बरं वाटतं. आपण पण माणूस आहोत; आपल्यालाही आनंदानं जगण्याचा अधिकार आहे, याची जाणीव इथे आल्यावर होते. इथे मानानं वावरता येतं, त्यामुळे हॉटेलातलं नको वाटणारं काम करण्याची ताकद मिळते.”




महाराष्ट्रात एकूण २१० रात्रशाळा आहेत आणि त्यांच्यापैकी १५० मुंबईत आहेत. गोव्यामध्ये फक्त एक नाइट स्कूल आहे; कोलकात्यामध्ये नाइट स्कूल्सऐवजी नाइट कॉलेजेसवर भर आहे. आश्चर्याची आणि खेदाची गोष्ट म्हणजे सबंध देशाची राजधानी असलेल्या दिल्लीत अशा प्रकारची एकही शाळा वा कॉलेज नाही. अफाट पैसा आणि भपका असलेल्या या शहराकडे पैसा आहे; पण संस्कृती नाही. त्यामुळे शिक्षणासारख्या किरकोळ गोष्टीकडे लक्ष द्यायला वेळ नसावा हे ओघानंच आलं. मुंबईसारख्या सतत उद्यमशील, कष्ट करताना घड्याळ न पाहणाऱ्या आणि कोणत्याही कामाची लाज न वाटणाऱ्या शहरालाच शिक्षणाचं मोल कळावं हे स्वाभाविक आहे.

**रात्रशाळेतील विद्यार्थ्यांना वाचनालय, प्रयोगशाळा अशा सामान्य सोयीसुद्धा मिळत नाही तरीही इथले दरवर्षी २० हजारांहून अधिक विद्यार्थी दहावीच्या परीक्षेला बसतात. मोठ्या प्रमाणावर उत्तीर्ण होतात**

अधिक खेदाची गोष्ट म्हणजे शिक्षणप्रसाराचं पवित्र काम करणाऱ्या आणि गरीब, मागास वर्गातल्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणाऱ्या या रात्रशाळांबद्दल राज्य आणि केंद्र सरकारना काडीची आस्था नाही. इतर शाळांना मिळणारी आर्थिक मदत राहोच, अशा शाळांना जागा उपलब्ध करून देण्यातही सरकार काहीच